# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२८२८९९६, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : www.mjp.maharashtra.gov.in


## परिपत्रक क्र.१७६

**विषय:** अतिरिक्त बाबी व कलम-३८ अंतर्गत वाढीव परिमाणांचे प्रस्ताव मंजूर करण्यापूर्वी, अवलंबवावयाच्या कार्यपध्दतीबाबत.

**संदर्भ:** १) पाटबंधारे विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१०९४/(११५/९४) मोप्र (प्र), दि.१५.७.१९९४
२) सार्व. बांधकाम नियमावली पुस्तिकेतील परिच्छेद क्र.२२७ ते २३२.
३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.८० दि.१.८.२००२
४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.८३ दि.१२.८.२००२

संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये, वाढीव परिमाणे राबविताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ नुसार, अतिरिक्त बाब दरसूचीबाबत, घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र.३ व ४ नुसार, अतिरिक्त बाबी व वाढीव परिमाणांचे प्रस्ताव मंजूरीचा अधिकार व अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

असे आढळून आले आहे की, काही प्रकरणी वरिष्ठ कार्यालयाची किंवा प्रस्ताव मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी न घेता कामे करुन घेण्यात येतात व यथावकाश प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येतात. ही पध्दत संदर्भ क्र.१ व २ अन्वये शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करणारी तसेच प्रशासकीय व आर्थिक अनियमितता करणारी आहे.

(कृ.मा.प.)

या बाबी विचारात घेऊन, संदर्भिय परिपत्रक क्र.३ व ४ अन्वये निर्गमित करण्यात आलेला मंजूरीचा अधिकार कायम ठेवून, पुढीलप्रमाणे सुधारीत सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) अतिरिक्त बाबींच्या बाबतीत संबंधीत परिमाणांची कामे सुरु करण्यापूर्वी खालील प्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांची लेखी परवानगी प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे.

| अतिरिक्त बाब प्रस्तावाची निव्वळ किंमत | पूर्व परवानगी देण्यास सक्षम अधिकारी |
|---|---|
| एक बाब रु.१० लक्ष पर्यंत (एकूण ५० लक्ष) | अधीक्षक अभियंता |
| एक बाब रु.२५ लक्ष पर्यंत (एकूण १०० लक्ष) | मुख्य अभियंता |
| एक बाब रु.२५ लक्ष पेक्षा जास्त (एकूण १०० लक्ष च्या वर) | सदस्य सचिव |

२) कलम-३८ अंतर्गत वाढीव परिमाणांच्या बाबतीत संबंधीत परिमाणांची कामे सुरु करण्यापूर्वी खालील प्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांची लेखी परवानगी प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे.

| वाढीव परिमाणांच्या प्रस्तावाची निव्वळ किंमत | पूर्व परवानगी देण्यास सक्षम अधिकारी |
|---|---|
| रु.१० लक्ष पर्यंत | अधीक्षक अभियंता |
| रु.३० लक्ष पर्यंत | मुख्य अभियंता |
| रु.३० लक्ष पेक्षा जास्त | सदस्य सचिव |

३) वरीलप्रमाणे परिमाणे राबविण्यापूर्वी योजनेस अधीक्षक अभियंता तसेच आवश्यकता असल्यास मुख्य अभियंता यांनी प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी करुन, प्रस्तावाच्या निकडीबाबत खातरजमा करुन घेऊन, याबाबत सविस्तर तांत्रिक तपशीलासह आवश्यकता स्पष्ट करुन शिफारशीसह क्षेत्रिय पाहणी अहवाल निर्गमित करावा. प्रस्ताव मंजूरीकरीता सादर करताना, प्रस्तावासोबत सदर अहवाल अंतर्भूत करण्यात यावा.

४) वरीलप्रमाणे पूर्व परवानगी घेऊन, प्रस्ताव मान्यतेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात यावा.

(कृ.मा.प.)

५) अतिरिक्त बाब/वाढीव परिमाणे यांच्यावर होणारा खर्च विचारात घेऊन, योजना पूर्णत्वासाठी मंजूर योजनेपेक्षा जास्त खर्च होणे अपेक्षित असल्यास, प्रथम सुधारीत योजना तयार करुन, शासनास/प्रशासकीय मान्यता देणाऱ्या प्राधिकाऱ्यास सादर करुन त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. तद्नंतरच पूर्वपरवानगीने अशी कामे करुन घेता येतील.

वरील सूचनांची या परिपत्रकाच्या दिनांकापासून तात्काळ काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन न केल्यास म.ना.सेवा (वर्तणूक) नियमाचे कलम-३ चे उल्लंघन केल्याचे समजण्यात येईल.

या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सूचनांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर म.ना.से. (शिस्त व अपील) नियमामधील तरतूदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

9/3/16

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

**जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/** 268
**दि.९ मार्च, २०१६**

**प्रत माहिती व अनुपालनाच्या कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गु.प.प., महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/औरंगाबाद/ लातूर/नांदेड/ नाशिक/ अहमदनगर/ अमरावती / अकोला / नागपूर / चंद्रपूर.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वि., ठाणे/ अंबरनाथ (जव्य)/ विरार (जव्य)/ पनवेल(जव्य)/ माणगांव/ रत्नागिरी/ओरस कणकवली/ पुणे-१ /पुणे-२/ कराड/ सातारा (जव्य)/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ औरंगाबाद / बीड/जालना/ लातूर/ उस्मानाबाद/ नांदेड/ परभणी/ जळगाव/ नाशिक/नाशिक (जव्य)/अहमदनगर/संगमनेर/अमरावती/ अमरावती (जव्य)/२/यवतमाळ/ अकोला/ वाशिम / बुलढाणा/ नागपूर/ नागपूर (जव्य)/ गोंदिया/ चंद्रपूर/ वर्धा.

जीवन प्राधिकरण
09 MAR
9/3/16